R.No. MHAMAR/25/A3029

दैनिक **महावृत्त**

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ८०

दि.०८ मार्च २०२६,वार: रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

# रंगपंचमी निमित्त लातूर पोलिसांचा कडक बंदोबस्त; शांतता, सुरक्षितत व सौहार्दपूर्ण वातावरणात सण साजरा करण्याचे आवाहन.

लातूर :-लातूर जिल्ह्यात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही रंगपंचमीचा सण मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा केला जाणार आहे. या दिवशी नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येऊन रंगोत्सव साजरा करत असल्याने शहर व जिल्ह्यात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी लातूर पोलीस दलाकडून जिल्हाभर व्यापक आणि कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. संवेदनशील व गर्दीच्या ठिकाणी विशेष लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले असून सणादरम्यान कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे.

रंगपंचमीच्या दिवशी शहरातील हनुमान चौक, ट्युशन एरिया, पाच नंबर चौक, नवा रेणापूर नाका, संविधान चौक, राजीव गांधी चौक तसेच इतर महत्त्वाच्या चौक व गर्दीच्या ठिकाणी विशेष नाकाबंदी व कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या ठिकाणी पोलिसांकडून संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवले जाणार असून वाहतूक सुरळीत राहण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दामिनी पथकाकडून विशेष गस्त वाढविण्यात आली आहे, तर वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक शाखेमार्फत विशेष ट्रॅफिक नियोजन करण्यात आले आहे. तसेच स्थानिक गुन्हे शाखा व डी.बी. विशेष पथके यांनाही सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असून गुन्हेगारांवर कडक नजर ठेवण्यात येणार आहे.

रंगपंचमीच्या दिवशी काही युवकांकडून उत्साहाच्या भरात रॅश ड्रायव्हिंग, मोटारसायकलवर दोनपेक्षा अधिक जण बसून धोकादायक पद्धतीने वाहन चालविणे, स्टंटबाजी करणे तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे असे प्रकार घडण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांकडून विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे. यासाठी पायी गस्त (फुट पेट्रोलिंग), बीट मार्शल, चार्ली मोटारसायकल पेट्रोलिंग तसेच जीप पेट्रोलिंग मोठ्या प्रमाणात सुरू ठेवण्यात येणार आहे.

याशिवाय मादक किंवा अमली पदार्थांचे सेवन करून वाहन चालविणाऱ्या व्यक्तींवर विशेष कारवाई करण्यात येणार असून अशा वाहनचालकांविरुद्ध कायद्यानुसार कठोर दंडात्मक कारवाई केली जाईल.तसेच सायलेन्सर फटाके लावून ध्वनी प्रदूषण करणाऱ्या वाहनांवर तसेच रॅश ड्रायव्हिंग करणाऱ्यांवरही कारवाई करण्यात येणार आहे.

सणादरम्यान धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत याबाबत विशेष दक्षता घेण्यात येणार असून आक्षेपार्ह घोषणा देणे, भडकाऊ बॅनर किंवा पोस्टर लावणे अशा प्रकारांवर पोलिसांकडून तात्काळ कारवाई करण्यात येईल. तसेच सार्वजनिक ठिकाणी महिलांची छेडछाड करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.यासोबतच जलद कृती दल (टठढ) देखील सज्ज ठेवण्यात आले असून कोणतीही आकस्मिक परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी विशेष पथके तयार ठेवण्यात आली आहेत.

तसेच पुढील बाबींवरही पोलिसांकडून विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे.-धोकादायक रंगांचा वापर रोखण्यासाठी कारवाई.*

रंगपंचमीच्या दिवशी रंगांमध्ये दाहक, रासायनिक किंवा ज्वलनशील पदार्थांचा वापर करून कोणालाही इजा पोहोचविण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित व्यक्तींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

अवैध दारू विक्रीविरुद्ध विशेष मोहीम.- सणाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील विविध भागात अवैध दारू विक्री, साठवणूक किंवा वाहतूक करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात येणार असून पोलिसांकडून छापे टाकून कडक कारवाई करण्यात येईल.

घातक शस्त्रे बाळगणाऱ्यांवर कडक कारवाई.-सार्वजनिक ठिकाणी चाकू, तलवार, लोखंडी रॉड किंवा इतर घातक शस्त्रे बाळगून फिरणाऱ्या व्यक्तींवर पोलिसांकडून विशेष लक्ष ठेवण्यात येणार असून अशा व्यक्तींविरुद्ध शस्त्र कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

सोशल मीडियावर विशेष नजर-सणाच्या काळात सोशल मीडियावर अफवा, भडकाऊ संदेश किंवा समाजामध्ये तेढ निर्माण करणारी माहिती प्रसारित करणाऱ्या व्यक्तींवर पोलिसांकडून बारकाईने लक्ष ठेवण्यात येणार असून अशा प्रकारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

ध्वनी प्रदूषणाविरोधात कारवाई.-ध्वनी प्रदूषण प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात ध्वनीवर्धक यंत्रणा वापरणे, सायलेन्सरमध्ये बदल करून मोठा आवाज करणारी वाहने चालविणे किंवा इतर प्रकारे ध्वनी प्रदूषण करणाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार आहे.

लातूर पोलीस दल नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सदैव सज्ज असून सण-उत्सव शांततेत, आनंदात आणि सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडावेत यासाठी पोलिसांकडून व्यापक नियोजन करण्यात आले आहे.नागरिकांनीही रंगपंचमी साजरी करताना जबरदस्तीने रंग लावणे टाळावे, वाहतूक नियमांचे पालन करावे, इतर समाज बांधवांच्या धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन लातूर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

सर्व नागरिकांनी परस्पर सहकार्य, समन्वय व बंधुता जपत रंगपंचमीचा सण सुरक्षित, शांततामय व खेळीमेळीच्या वातावरणात साजरा करावा, असे आवाहन लातूर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# जागतिक महिला दिनानिमित्त मनपा महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान नगरसेविका निकिता सोमवंशी यांनी केला



लातूर : आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त लातूर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग क्रमांक ७ मधील महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. वंचित बहुजन आघाडीच्या नगरसेविका निकिता रोहित सोमवंशी यांनी सर्व महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांना आपल्या घरी आमंत्रित करून त्यांना भेटवस्तू देत त्यांचा गौरव केला.

यावेळी नगरसेविका निकिता सोमवंशी यांनी महिला कर्मचाऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी आणि समस्यांची विचारपूस केली. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी महिला कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगत त्यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच भविष्यातही महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहू, असे आश्वासन त्यांनी दिले.

या कार्यक्रमात महिलांना सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यामुळे महिला कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. समाजातील महत्त्वाच्या सेवेत कार्य करणाऱ्या महिलांना सन्मान देण्याचा हा प्रयत्न असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

यावेळी ॲड. रोहित सोमवंशी (जिल्हा महासचिव, वंचित बहुजन आघाडी) तसेच मनपा कर्मचारी घोडके साहेब उपस्थित होते. उपस्थितांनीही महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या.

# सरला राजेश्वराव शेष यांना आदर्श महिला नारी पुरस्कार प्राप्त



नवी मुंबई / के. एच. हनवते :- अखिल भारतीय बहुभाषीय ब्राह्मण महासघ महाराष्ट्र संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य, महिला प्रदेश संघटक, सरला राजेश्वराव शेष यांना माऊली हेल्प फाउंडेशन या सामाजिक संस्था द्वारे नाशिक मध्ये नुकताच आदर्श महिला नारी पुरस्कार प्रदान करण्यात आला. शेष यांना पूर्वीपासूनच सामाजिक कार्याची आवड आहे. त्यांनी संघटन द्वारे रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, आध्यात्मिक , बालसंस्कार वर्ग, अशा प्रकारचे छोटे-मोठे कार्यक्रम घेऊन महिला मधे आदर्श निर्माण करण्यात त्यांचे भरीव योगदान आहे. तसेच महिला करिता रोजगार उद्योग करण्यासाठी विशेष प्रशिक्षण देऊन सर्व महिला यांना संघटित करून रोजगार व्यवसाय मार्गदर्शन शिबिरे घेऊन प्रयत्नाची पराकाष्ठा केली.

.त्या सामाजिक चळवळतील एक ज्येष्ठ महिला कार्यकर्त्या आहेत. सामाजिक,अध्यात्मिक, सांस्कृतिक, क्षेत्रात आज पर्यंत त्यांनी अनेक उपक्रम राबवत मोलाचा पुढाकार व योगदान दिले आहे.महाराष्ट्रमधे अनेक जिल्ह्यात महिला संघटित करून सामाजिक बाधिलकीवर भर देण्यात येत आहे.या पुढे महाराष्ट्र भर विभागीय जिल्हा तालुका स्तरावर विशेष महिला मेळावे घेऊन महिला एकत्र करून विशेष उद्योग व्यवसाय आध्यात्मिक सांस्कृतिक संगीत कार्यक्रम महाराष्ट्र भर दौरे व सभा घेऊन एक मोठी नारीशक्ती सबलीकरण एकत्रित संघटित करण्यावर भर राहणार असल्याचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य महिला प्रदेश संघटक सरला राजेश्वराव शेष यांनी सांगितले.

त्यांच्या या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# छ. शिवाजी महाराजांचा राज सिंहासनावरती आरुढ पुतळा ; नेरूळ, नवी मुंबईकरांसाठी एक भूषण



नवी मुंबई / के. एच. हनवते :- हिंदवी स्वराज्याचे संस्थापक : राजे छत्रपती : शिवाजी महाराजांचा राज सिंहासनावर आरूढ पूर्णाकृती पुतळा बसवण्यात आल्यानंतर पहिल्यांदाच छत्रपती शिवाजी महाराज चौक नेरूळ नवी मुंबई येथे जयंती उत्सव मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात साजरा करण्यात आला, त्यावेळी पत्रकार : कल्याणराव हनवते सह समाजसेवक : उमेश गायकवाड यांनी उपस्थित राहून राजे छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा केला. या शानदार पुतळ्यामुळे नेरूळ नगरीला चार चाँद लागले आहेत, गेल्या अनेक वर्षापासून समस्त नेरूळकरांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे या शानदार भव्य दिव्य चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा सिंहासनावर आरुढ झालेला पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला, त्यामुळे आपल्या सर्वांसाठी आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून नेरूळ नगरीमध्ये सर्वप्रथम ज्वेल ऑफ नवी मुंबई पार्कमध्ये लॉर्ड बुद्धांची; भव्य दिव्य ध्यानस्थ मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली, आणि त्यानंतर नेरूळ येथील छत्रपती शिवाजी चौक येथे राजे छत्रपती : शिवाजी महाराजांचा पुतळा विराजमान झाला,

आता आपल्या सर्वांचे एकच लक्ष (मान्यताप्राप्त) पुतळा; आधुनिक भारताचे संविधान निर्माते : परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्यदिवे पूर्णाकृती पुतळा नवी मुंबई महानगरपालिकेने (नमुमपा) परिसरातच १४ एप्रिल पूर्वी लवकरात लवकर पूर्णाकृती पुतळ्याची उभारणी करावी..! हीच सर्वत्र चर्चा होत आहे.

# मनपा शाळेत Eat Right मोहिमेस सुरुवात



लातूर/ प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या संतुलित आहार (एरीं ठळसहीं) या मोहिमेचा मनपाच्या शाळा क्रमांक ९ येथून शुभारंभ करण्यात आला.

मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या संकल्पनेतून तसेच उपायुक्त श्रीमती वसुधा फड यांच्या मार्गदर्शनात मनपा शाळा मधील विद्यार्थी व त्यांच्या पालकांसोबत आरोग्य विभागाच्या वतीने संतुलित आहार विषयी चर्चासत्र घेण्यात आले.या चर्चासत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

मागील महिन्यापासून मनपा शाळातील सर्व मुलांची तपासणी सुरू आहे.शाळकरी मुलांच्या वाढीकडे लक्ष देत त्यांच्यातील कुपोषितपणा शोधण्याचे काम यातून केले जात आहे.या तपासणीमध्ये जी मुले वयोमानानुसार वजनाने कमी आढळली त्यांची पुढील वर्षभरात दर महिन्यास तपासणी केली जाणार आहे. गरज पडल्यास मोफत औषधोपचार करून वजन वाढविण्यासाठी आरोग्य विभागाच्या वतीने आहाराविषयी समुपदेशन केले जाणार आहे.याच मोहिमेचा भाग म्हणून शाळा क्रमांक ९ मध्ये झालेल्या या चर्चासत्रात पालकांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

मनपाचे आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती,आहार तज्ञ श्रीमती अंधोरीकर,माता व बालसंगोपन अधिकारी डॉ.श्यामा जाधव,आरबीएसके वैद्यकीय अधिकारी डॉ. व्यवहारे,डॉ.शीला पवार यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांची यावेळी उपस्थिती होती.

# सुशिक्षित महिलांचा अज्ञानी जागतिक महिला दिन !.

आपल्या देशात आपल्या मातृभूमीत जन्मलेल्या लोकांचे फारसी दखल घेतली जात नाही.पण सातासमुद्रापार कोणी काही केले असेल तर त्याला जागतिक महत्व असते. त्यामुळेच देशात प्रत्येक वेळा जागतिक दिन मानले जातात व ते उस्त्पुर्तपणे साजरे केले जातात. भारत हा कृषीप्रधान देश आहे त्यात महिलांचे प्रमाण पुरुषा बरोबर ८५/९० टक्क्या पर्यंत आहे.महिला वर्ग हा सर्वात अज्ञानी,असुशिक्षित,असंघटीत होता आणि आज ही आहे.मुठभर महिला सुशिक्षित उच्चशिक्षित सुद्धा आहेत. त्या दरवर्षी महिला दिन आठ मार्चला साजरा करतात.पण ९० टक्के महिलांना आठ मार्च महिला दिन का साजरा करतात.ते सांगता येत नाही.जगातील महिला एकत्र येऊन त्यांनी मोठा संघर्ष केला म्हणून आठ मार्च जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो असे म्हणतात. पण त्या कोण महिला होत्या त्यांनी कोणा बरोबर संघर्ष केला.जातीव्यवस्थे विरोधात त्या लढल्या काय?.शिक्षण घेण्या करिता लढल्या काय?. त्याकाळी त्यांना शिक्षण घेण्याचा अधिकार होता काय?. मग त्यांनी डायरेक मतदानाचा अधिकार कसा काय मागितला?. भारतात तो जगाचा जागतिक महिला दिन का पाळला जातो.भारतातील महिलाच्या आणि जगातील त्या महिलांचे समस्या समान होत्या काय?.या देशात सात च्या आत महिला घरात पाहिजे शिक्षणात,संपतीत, मालमतेत, आर्थिकदृष्ट्या तिला आजही किती अधिकार आहेत.हे त्या महिला दिना निमित्य कोणी किती ऐतिहासिक कार्य केले. भारतातील बहुसंख्य असंघटीत महिलांना आठ मार्च महिला दिन कशाचा समजले पाहिजे.पण तसे न होता दरवर्षी सुशिक्षित महिलांचा अज्ञानी जागतिक महिला दिन साजरा होतो.

भारतात महिला दिनाची सुरुवात मुंबई येथे ८ मार्च १९४३ रोजी पहिला महिला दिन साजरा करून झाली. त्यानंतर ८ मार्च १९७१ ला पुण्यातील काही संघटनानी मोर्चा काढला. त्यानंतर १९७५ ला युनोने जागतिक महिला वर्ष म्हणून जाहीर केले.त्यानंतर स्त्रियांच्या समस्या ठळकपणे समाजा समोर येत गेल्या. स्त्रियांच्या संघटनांना बळकटी आली. स्त्रिया बोलत्या व्हायला लागल्या. बदलत्या सामाजिक,आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थिती नुसार काही प्रश्नांचे स्वरूप बदलत गेले तशा स्त्री संघटनांच्या मागण्याही बदलत गेल्या. आता बँका,रेल्वे सरकारी,निमसरकारी कार्यालये तसेच काही राजकीय पक्ष नेत्यांच्या घरात व कार्यालयात ८ मार्च महिला दिन साजरा व्हायला लागला.

भारतात ज्या महिलेने पहिले स्वता शिक्षण घेऊन मुलीना शिक्षण देण्यासाठी पाहिली शाळा काढली. ती १ मे १८४७ रोजी.सावित्रीबाई फुले (जन्म ३ जानेवारी १८३१,जन्म स्थळ- नायगाव,सातारा- मृत्यू- १० मार्च १८९७ पुणे येथे झाला.) त्या पहिल्या महिला शिक्षिका,शिक्षण प्रसारक,समाज सुधारक महिला होत्या.महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाची सुरुवात महात्मा ज्योतीराव फुले यांनी आपल्या पत्नीला शिक्षण देऊन केली. तो खरा महिला दिन किंवा महिला शिक्षण दिन असायला पाहिजे होता.पण..... हळदकुंकू, मंगल गौरी साजरा करणाऱ्याचा महिला दिन मोठ्या उत्स्पुर्तपणे साजरा होतांना दिसत आहे.म्हणूनच लिहतो सुशिक्षित महिलांचा अज्ञानी जागतिक महिला दिन !.

संपूर्ण अमेरिका आणि युरोपसहित जवळ जवळ जगभरच्या स्त्रियांना विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत मतदानाचा हक्क नाकारलेला होता. हे सांगितल्या जाते पण त्यांना शिक्षणाचा अधिकार होता काय हे सांगितल्या जात नाही. पुरुषप्रधान व्यवस्थेतील स्त्री-पुरुष विषमतेचे हे एक ढळढळीत उदाहरण देण्यात येते. या अन्याया विरुद्ध स्त्रिया (कोणत्या) आपापल्या परीने संघर्ष करीत होत्या. १८९० मध्ये अमेरिकेत मतदानाच्या हक्का संदर्भात द नॅशनल अमेरिकन सफ्रेजिस्ट असोसिएशन स्थापन झाली.परंतु ही असोसिएशन सुद्धा वर्णद्वेषी आणि स्थालांतरीत पूर्वग्रह असणारी होती. दक्षिणे कडील देशांना काळया मतदात्यां पासून आणि उत्तर व पूर्वेकडील देशांना तेथील बहुसंख्य देशांतरीत मतदात्यां पासून वाचवण्याकरता स्त्रियांना मतदानाच्या हक्क मिळायलाच हवा, अशा प्रकारचे आवाहन ती करत होती. अर्थात या मर्यादित हक्कांना बहुसंख्य काळया वर्णाच्या आणि देशांतरित कामगार स्त्रियांनी जोरदार विरोध केला आणि क्रांतिकारी मार्क्सवाद्यांनी केलेल्या सार्वत्रिक प्रौढ मतदानाच्या हक्कांच्या मागणीला पाठिंबा दिला. १९०७ साली स्टुटगार्ड येथे पहिली आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषद भरली.त्यामध्ये क्लारा झेटकिन या अतिशय लढाऊ बाण्याच्या, झुंजार कम्युनिस्ट कार्यकर्तीने सार्वत्रिक मतदानाचा हक्क मिळवण्या साठी संघर्ष करणे हे समाजवादी स्त्रियांचे कर्तव्य आहे.अशी घोषणा केली.

८ मार्च १९०८ रोजी न्यूयॉर्कमध्ये वस्त्रोद्योगातील हजारो स्त्री-कामगारांनी रुटगर्स चौकात जमून प्रचंड मोठी ऐतिहासिक निदर्शने केली. दहा तासांचा दिवस आणि कामाच्या जागी सुरक्षितता ह्या मागण्या केल्या. या दोन मागण्यां बरोबरच लिंग,वर्ण, मालमत्ता आणि शैक्षणिक पार्श्वभूमी निरपेक्ष सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा हक्क मिळावा अशी मागणीही जोरकसपणे केली. अमेरिकन कामगार स्त्रियांच्या या व्यापक कृतीने क्लारा झेटकिन अतिशय प्रभावित झाली.१९१० साली कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत, ८ मार्च १९०८ रोजी अमेरिकेतील स्त्री-कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ, ८ मार्च हा जागतिक महिला-दिन म्हणून स्वीकारावा असा जो ठराव क्लाराने मांडला, तो प्रसार झाला. यानंतर युरोप, अमेरिका वगैरे देशात सार्वत्रिक मतदानाच्या हक्कासाठी मोहिमा उघडल्या गेल्या. त्यांचा परिणाम म्हणून १९१८ साली इंग्लंडमध्ये व १९१९ साली अमेरिकेत या मागण्यांना यश मिळाले. तो महिला दिन डावे समाजवादी पुरोगामी भारतात साजरा करतात.त्यांना भारतातील १८३१ ला जन्मलेली आणि १८४७ ला मुली करिता म्हणजे महिला करिता पहिली शाळा काढलेली सावित्रीबाई फुलेचे कार्य आणि कर्तुत्व दिसत नाही. ज्या महिला आणि शिक्षणसंस्था सरस्वती शिक्षणाची देवी मानतात त्याच महिला आठ मार्च महिला दिन मोठ्या उत्साहाने साजरा करतात.हाच सुशिक्षित महिलांचा अज्ञानी महिला दिन असतो.

त्याच बरोबर ८ मार्च १९०८ रोजी न्यूयॉर्कमध्ये वस्त्रोद्योगातील हजारो स्त्री-कामगारांनी रुटगर्स चौकात जमून प्रचंड मोठी ऐतिहासिक निदर्शने केली. दहा तासांचा दिवस आणि कामाच्या जागी सुरक्षितता ह्या मागण्या केल्या. या दोन मागण्यां बरोबरच लिंग,वर्ण, मालमत्ता आणि शैक्षणिक पार्श्वभूमी निरपेक्ष सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा हक्क मिळावा अशी मागनीने अमेरिका न्यूयार्क हालविला सांगितल्या जाते. तेच काम भारतातील मुंबईच्या असंघटीत गिरणी कामगाराना संघटीत करण्याचे काम महात्मा ज्योतीराव फुले यांचे शिष्य रावबहादूर नारायण मेघांजी लोखंडे यांनी १८६० ते १८९० पर्यंत केल. त्याची नोंद मात्र डावे समाजवादी पुरोगामी घेत नाही.रावबहादूर नारायण मेंघाजी लोखंडे यांनी सप्टेंबर १८८४ मध्ये मुंबई येथे पहिली मोठी कामगार परिषद भरवून कारखाना आयोगाकडे ५,५०० कामगारांचे लेखी निवेदन पाठविले. त्यात दर रविवारी पगारी सुटी, दररोज नियमित कामाच्या १४ तासांऐवजी आठ तास,मुलांचे नोकरीचे वय ७ वर्षांवरून ९ वर्षे करावे, दर महिन्याच्या १५ तारखेच्या आत वेतन मिळावे,कामगाराला दुखापत झाल्यास पगारी रजा मिळावी, तसेच फार मोठी शारीरिक इजा होऊन कामगार कामासाठी अपात्र ठरल्यास त्याच्या भावी जीवनासाठी आर्थिक तरतूद केली जावी. इत्यादी. मागण्यांचा समावेश करण्यात आला होता. या मागण्यांचे निवेदन कलकत्त्यास गव्हर्नर जनरलकडेही पाठविण्यात आले होते (१८८९). रावबहादूर नारायण मेंघाजी लोखंडे यांनी १८९० मध्ये मुंबई गिरणी कामगार संघ (बॉम्बे मिलहँड्स असोसिएशन) नावाची भारतातील पहिली कामगार संघटना स्थापना केली होती. एप्रिल १८९० मध्ये दहा हजार स्त्री-पुरुष कामगारांची मोठी परिषद रावबहादूर नारायण मेंघाजी लोखंडे यांनी मुंबईत भरविली होती. या परिषदेत स्त्रियांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. मुंबईतील औद्योगिक संघटनांच्या चळवळीतील ही महत्त्वाची घटना समजली जाते. त्यानंतर लगेचच १० जून,१८९० रोजी शासनाने, कामगारांना दर रविवारी पगारी सुटी देण्याचा निर्णय जाहीर केला. १८९० मध्ये कामगार कायदा संमत करण्यात येऊन लोखंडे यांच्या काही सूचनांचा त्यात समावेश करण्यात आला. सरकारने त्यांच्या कामगिरीची दखल देऊन त्यांना 'जे.पी.' हा किताब देऊन त्यांचा गौरव केला.हा इतिहास महिला दिन साजरा करणारे का विसरतात?. फुले लोखंडे याचे कार्या पेक्षा जात महत्वाची वाटते म्हणून का???.

भारतातील स्त्रीमुक्ती चळवळीच्या महिला नेत्यांना आणि त्याच्या आदर्श नेत्यांना भारतातील सावित्रीबाई ज्योतीराव फुले डोळ्या समोर ठेऊन महिला दिन साजरा करावा असे का वाटत नाही.कारण काल त्या होत्या म्हणून तुम्ही आज सन्मानाने या ठिकाणी आहेत भारतातील सावित्रीमाई फुले कुठे कमी पडतात. ते भारतातील महिला दिनाचे गोडवे गाणाऱ्या महिला पत्रकार,थोर विचारवंत,महिला साहित्यिक,लढाऊ महिला नेत्या आणि सुशिक्षित सुरक्षित नोकरी करणाऱ्या महिलांनी जाहीर पणे सांगावे. महिला दिन जरूर साजरा करा पण त्या भारतातील राष्ट्रमाता जिजाऊ,अहिल्याबाई होळकर,ताराराणी,सावित्रीबाई फुले,भिमाबाई,माता रमाई,इंदिरा,प्रतिभाताई,मायावती,जयललिता,ममता,ज्यांनी जीवनात खऱ्या अर्थाने संघर्ष करून इतिहास घडविला त्यांच्या आई बापाचे नांव गांव,तालुका,जिल्हा,राज्य माहित होते आणि आहे. त्या महिलांचा आदर्श आजच्या सुशिक्षित महिलांनी घेऊन महिला दिन साजरा करावा हीच अपेक्षा.आज राज्यात देशात महिलेवर तरुणीवर लैंगिक अत्याचार केला जातो. त्यावेळी त्या तरुणीची महिलेची जात आणि अत्याचार करणाऱ्यांची जात माहिती पडल्या नंतर आंदोलन करणाऱ्या संस्था,संघटना,कार्यकर्ते,नेते,समाज सेवक,पत्रकार,संपादक कशी भूमिका घेऊन काम करतात हा एक सत्य संशोधन करण्याचा विषय झाला आहे. म्हणूनच शेवटी मान्य नसलेल्या व मनुवादी विचारांच्या राजकीय लोकांनी लादलेल्या महिला दिन. सुशिक्षित महिलांच्या अज्ञानी जागतिक महिला दिनाला सुद्धा हार्दिक शुभेच्छा. धन्यवाद!.

**सागर रामभाऊ तायडे.**
**९९२०४०३८५९, भांडुप, मुंबई**
**अध्यक्ष सत्यशोधक कामगार संघटना, स्वतंत्र मजदूर युनियन, महाराष्ट्र राज्य**

# महात्मा बसवेश्वरांच्या महिलाविषयक विचारांची प्रासंगिकता

बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी प्रथमतः मंगळवेढा आणि त्यानंतर बसवकल्याण येथे आपल्या विचार आणि कार्याद्वारे महान सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्रांती घडवून आणली. ही क्रांती मानवजातीच्या इतिहासात अभूतपूर्व आहे.भगवान गौतम बुद्धानंतर सामाजिक विषमता,स्त्री _पुरुष विषमता, , स्पृश्य अस्पृश्यतेला छेद देणारा महान क्रांतिकारी प्रयोग महात्मा बसवेश्वरांनी साकार केला .भगवान गौतम बुद्ध, महावीर वर्धमान ,येशू ख्रिस्त, संत कबीर, गुरु नानक ,शाहू फुले_आंबेडकर ,तुकडोजी महाराज यांच्या मालिकेतील थोर मानवतावादी आणि कृतिशील सुधारक महात्मा बसवेश्वर प्रस्थापितांच्या विरुद्ध बुलंद आवाज उठविला.धर्मांध ,दांभिक , बेगडी वृत्तीच्यालोकांचे वाभाडे काढले आणि सामान्य जनतेला भक्तीचे महाद्वार उघडत असताना असे स्पष्ट केले की देवालयापेक्षा देहालय श्रेष्ठ आहे.श्रम हाच कैलास हा सिद्धांत महात्मा बसवेश्वरांनी पटवून दिला. श्रमाची उपासना हीच खरी ईश्वराची उपासना आहे .श्रम केल्याशिवाय कोणालाही भाकरी खाण्याचा अधिकार नाही अशी महात्मा बसवेश्वरांनी आपली भूमिका स्पष्ट केली .

बाराव्या शतकात समाजात जातीव्यवस्था खोलवर रुजलेली होती. समाजात महिलांचे स्थान दुय्यम प्रतीचे असून महिलांना शिक्षण, राजकारण ,धार्मिक कार्य इत्यादी कोणत्याही क्षेत्रात कार्याची संधी दिली जात नव्हती. समाजात सर्वदृष्टीने पुरुषांपेक्षा स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ स्वरूपात होता .चूल आणि मूल इतकेच मर्यादित आयुष्य स्त्रियांचे होते. समाजात जातीव्यवस्था , अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी प्रथा ,परंपरा खोलवर रुजलेल्या असून तत्कालीन हिंदू धर्मशास्त्रकारांनी स्त्रियांना शूद्र, मायावी ,अपवित्र, नकाराचे द्वार असे संबोधले होते अशा प्रतिकूल परिस्थितीत महात्मा बसवेश्वरांनी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीची प्रतिष्ठा, अधिकार मिळवून दिले सर्व जातीवर्णाच्या स्त्री-पुरुषांसाठी एकाच प्रकारचे इष्टलिंग उपास्य वस्तू म्हणून दिले एकाच प्रकारचा दीक्षा संस्कार आणि साधना मार्ग सांगितला.एवढेच नव्हे तर शारीरिक मासिक धर्मात स्त्रीला अस्पृश्य न मानता त्यांनी तिला देवपूजेचा अधिकार दिला आज विज्ञानवादी दृष्टिकोन असणाऱ्या समाजास ही गोष्ट साधी सोपी वाटत असली तरी बाराव्या शतकात कोणतेही समाज, धर्म सुधारणेचे वारे नसलेल्या, अंधश्रद्धा, जातीभेद, अनिष्ट रूढी प्रथा, परंपरा यांच्या विळख्यातअडकलेल्या समाजात असा पुरोगामी विचार रुजवणे ही एक क्रांतिकारी घटना होती. महात्मा बसवेश्वरांनी वेद, पुराण आणि स्मृतींचा अभ्यास केला होता .वेदकाळात स्त्री-पुरुष समानता होती किंबहुना महिलांना प्रत्येक क्षेत्रात सन्मानाचे , आदर्श स्थान होते. शिक्षण वेदाधिकार असलेली स्त्री स्मृति काळात आपले रूप गमावून बसली तसेच मध्ययुगीन कालखंडात झालेल्या परकीय आक्रमणामुळे महिलांच्या सुरक्षिततेसाठी भारतीय समाजातील पुरुषवर्ग पुढे सरसावला आणि स्त्री वर्ग मागे राहिला . परकिय आक्रमणांपासून महिला सुरक्षित असल्या पाहिजेत या भावनेतूनच महिला वर्ग उंबरठ्याच्या आतच राहीला.

वेद काळात गार्गी ,मैत्रेयी, लोकामुद्रा अशा विद्वान स्त्रियांची कामगिरी , विश्वावरा इंद्राणी या उपनिषदकाळात यज्ञयाग विधीत सहभागी असलेल्या महिलांची कामगिरी, पुराण काळात सीता, द्रौपदी, मंदोदरी यांची विशेष कामगिरी होती.असा प्राचीन भारतीय महिलांचा गौरवशाली इतिहास असतानात्यानंतरच्या काळात स्त्रियांना धार्मिक संस्कारापासून दूर का ठेवले जाते हा प्रश्न बसवेश्वरांना सतावू लागला. स्त्रीच्या अवनीतीचा आणि अवहेलनेचा इतिहास त्यांच्यासमोर होता ज्यावेळी बसवण्णांच्या उपनयन संस्काराची वेळ आली तेव्हा त्यांचे मन अस्वस्थ झाले आणि मौजी बंधनाला त्यांनी विरोध केला उपनयन संस्कारापासून माझ्या बहिणीला वंचित का ठेवता असा प्रश्नही त्यांनी विचारला एकाच घरात जन्मलेल्या मुला-मुलींमध्ये एक धार्मिक संस्कार मुलाचा होतो आणि मुलींचा होत नाही हे बसवेश्वरांच्या तार्किक बुद्धीला पटले नाही त्यामुळेच पुढील आयुष्यात पर्यायी समाज निर्माण करून पाखंडी सनातनी समाजाला त्यांनी विरोध केला दीक्षा संस्कार हा मुला बरोबरच मुलींचाही असू शकतो हे समाजाला दाखवून दिले .स्त्रीशक्तीची आजची मूल्ये बाराव्या शतकातील महिलांच्या सुधारणेशी कितपत योग्य आहेत या प्रश्नांची उत्तरे बसवेश्वरांच्या वचनातून आणि अनुभव मंडपातील शिवशरण यांच्या अविष्कारातून लक्षात येतात. समाजाला अंधश्रद्धेच्या विळख्यातून बाहेर काढून स्त्री पुरुष समानता , स्त्रीयांचे स्वातंत्र्य, व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य, आंतरजातीय विवाह ,लोक भाषेचा वापर इत्यादी तत्वे प्रमाणभूत मानली आपण प्रतिपादन करत असलेल्या मानव धर्माच्या तत्त्वांची चर्चा, चिकित्सा व्हावी विचारमंथन व्हावे यासाठीच बसवेश्वरांनी इ. स. ११४१ मध्ये अनुभव मंटप हे सामाजिक ,सांस्कतिक, विचारपीठ स्थापना केले. अनेक विचारवंतांनी या पीठास धर्मपरिषद, विद्वत सभा, लोकपीठ, मुक्त विद्यापीठ इत्यादी नावांनी संबोधले आहे .अनुभव मंडपाची संकल्पनाच अभिनव क्रांतिकारी होती येथे रावापासून रंकापर्यंत, ब्राह्मणांपासून अंतजापर्यंत सर्व शिवभक्तांना प्रवेश होता. देशाच्या सर्व भागातून बसवेश्वरांच्या अनुभव मंटपाकडे शेकडो साधुसंत आकर्षित झाले होते. ब्राह्मणांबरोबर चांभार ,ढोर, कोष्टी, बुरुड ,नावाडी ,न्हावी, कुंभार, तेली,सोनार अशा सर्व जातीपातीचे लोक एकत्र येत होते .अनुभव मंटप ही एक सामाजिक समतेची आणि बंधूतेची प्रयोगशाळाच होती. म. बसवेश्वरांना संपूर्ण जगच अनुभव मंटप व्हावे हा विश्वव्यापी विचार म. बसवेश्वरांचा होता. महात्मा बसवेश्वरांनी सर्व अठरापगड जाती जमातीतील, विविध धर्मातील स्त्री-पुरुषांना वैचारिक चिंतन आणि संवाद करण्यासाठी एकत्र आणले . अनुभव मंडपात जसे साधू पुरुष होते तशा साध्वी स्त्रियाही होत्या. अनुभव मंडपाचे ७७७ सदस्य आणि त्यापैकी ७७ स्त्रियांचा समावेश होता. या ७७ शरणींपैकी बसव पत्नी नीलांबिका ,महायोगिनी, अक्का महादेवी ,लिंगम्मा या साध्वींनी अध्यात्मिक क्षेत्रात आणि योगविद्येत यशाचे शिखर गाठले होते बसवेश्वरांनी निर्माण केलेल्या नव्या समाजशास्त्रांमुळे आणि त्यातील स्त्रियांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या स्थानामुळे हे शक्य झाले होते. महिलांना समाजात मानाचे स्थान देऊन महात्मा बसवेश्वर थांबले नाहीत तर स्त्री स्वातंत्र्याचा संकोच करणाऱ्या बालविवाह सारख्या अनिष्ट प्रथांना प्रोत्साहन देणाऱ्या सनातनी विचारकांना विरोध करून विधवा विवाह ,आंतरजातीय विवाह, यांसारख्या पुरोगामी सुधारणांचा निर्भयपणे पुरस्कार केला.

अनुभव मंडपात सर्व सदस्यांच्या संमतीने व साक्षीने बसवणांनी मधुवरस या ब्राह्मण मंत्र्याची मुलगी आणि हरळय्या या चांभार व्यक्तीचा मुलगा यांचा आंतरजातीय विवाह घडवून आणला ज्या काळात अस्पृश्यांची सावली ही अंगावर पडणे म्हणजे अशुभ मानले जात होते त्या काळात एका अस्पृश्य समाजातील मुलीचा विवाह उच्चवर्णीय ब्राह्मण मुलाशी घडवून आणणे ही न भूतो न भविष्यती अशी घटना होती या घटनेमुळे तत्कालीन सनातनी समाजाचा प्रचंड विरोध झाला संपूर्ण मध्ययुगात अशी सामाजिक क्रांतिकारी घटना कुठेही घडली नव्हती अनुभव मंडपात महात्मा बसवेश्वर सर्व जाती धर्माच्या लोकांना प्रवेश देत होते इथपर्यंत ठीक होते परंतु आता ते त्यांच्यात आंतरजातीय विवाह घडवून आणू लागल्यावर सनातन्_वाद्यांनी हलकल्लोळ माजविला त्यांनी बसवेश्वरांना धर्मद्रोही ठरविले आणि बिज्जल राजाच्या मदतीने हरळय्या त्यांचा पुत्र आणि मधुवरस यांना हत्तीच्या पायी बांधून फरकटत ओढण्याची शिक्षा दिली यात तिघांचेही दुःखद निधन झाले त्यानंतर बसवेश्वरांचे अनुयायी आणि सनातनवादी यांच्यात यादवी सुरू झाली यात बिज्जल राजा ही मरण पावले त्यानंतर बसवेश्वरांनी बसवकल्याण सोडले आणि कुडलसंगम येथे संगमात आत्मसमर्पण केले. जगातील विविध राष्ट्राच्या संसदेचा विचार केला असता असे स्पष्ट होते की इंग्लंडच्या पार्लमेंटच्या ही पूर्वी महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंडप ही संसद स्थापन केली. अनुभव मंडपात जात ,धर्म पंथ ,लिंग, वय, वर्ग ,प्रांत, भाषा असा कोणताही भेदभाव पाळला जात नव्हता .अनुभव मंडपात सहभागी झालेले पुरुष शरण तर महिलांना शरणी म्हणून संबोधले जात. शरण शलणी आपले अनुभव वचनांच्या माध्यमातून व्यक्त करत. अनुभव मंटपात शरण_शरणी यांचे साहित्य निर्माण झाले. त्या आधारे महिलांच्या जीवनातील बदल लक्षात येतो. अनुभव मंडपात जी तत्व स्वीकारण्यात आली .ती तत्व भारतीय संविधानात स्वीकारलीआहेत.समताधिष्ठीत समाज रचना निर्माण करत असताना अनुभव मंडपातील तळागाळातील स्त्रीयांना 'शरणी' हे मानाचे बिरुद दिले. समाजातील जातीव्यवस्थेतील स्त्री पुरुष विषमता नष्ट केली.

कायकवे केलास ही श्रमप्रतिष्ठा स्त्रियांना लाभल्यामुळे त्यांना आर्थिक स्वातंत्र्य ही मिळाले. बसवेश्वर कालीन शरणींमध्ये अक्का महादेवी हे एक उत्तुंग अध्यात्मिक व्यक्तिमत्व होते. राजऐश्वर्य नाकारून लोकनिंदेला न जुमानता अक्कमहादेवी यांनी आध्यात्मिक उंची गाठली. मुक्ताई अक्का ,सत्याक्का रायमा ,नीलाम्बिका, गंगाम्बिका, लिंगम्मा अशा अनेक महिलांनी महात्मा बसवेश्वरांचे कार्य तत्व स्वीकारले होते .महात्मा बसवेश्वरांच्या उदात्त स्त्री विषयक दृष्टिकोनामुळे तत्कालीन समाजात वंचित, उपेक्षित, दुर्लक्षित असलेल्या स्त्रियांना चैतन्य प्राप्त झाले .बसवण्णांचे दासोह तत्व यांचे पालन समाजातील अनेक महिलांनी केले .छलबेकु शरणंगे परसतिओल्लेनेंब म्हणजे 'परस्त्री कडे कामदृष्टीने बघणार नाही.' परस्त्री महादेवी आहे हा मनोनिग्रह सर्व शरणांनी केला पाहिजे असा बसवण्णांचा अनुभव मंटपात दंडक होता. समाजातील स्त्री प्रश्न अत्यंत तार्किक बुद्धीने महात्मा बसवेश्वरांनी सोडविला कुटंब संस्था व्यापक बनविली शरणसती लिंगपती या विचाराने दांपत्य जीवनाला आध्यात्मिक पातळीवर नेले आणि अलौकिक भाव लौकिक जगात आणला.

बसवण्णांनी समाजाला भक्तीबरोबरच ज्ञानाचे महत्व प्रतिपादित केले. गीताप्रणित कर्मयोगाची शिकवण समाजाला देऊन कार्यप्रवण केले. ज्ञान, कर्म आणि भक्ती यांचा सुंदर मिलाप घडवून आणला. आपले जीवन निरर्थक समजत असलेल्या स्त्रीयांमध्ये स्वाभिमान, लेखन, वाचन, श्रमनिष्ठा, विवेकशील वृत्ती इ. शिकवण विकसित करण्यात आली. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, धार्मिक, आध्यात्मिक उपासनेचे अधिकार इत्यादी मूलभूत तत्वांचा पुरस्कार रूसोच्याही पूर्वी

(६५० वर्ष पूर्वी) बसवण्णांनी केला. तर कार्ल मार्क्स च्या अगोदर सुमारे ७०० वर्षापूर्वी महात्मा बसवेश्वरांनी श्रमाधिष्ठित जीवन जगण्याची शोषणरहित पध्दती दाखवून दिली.बसवण्णांच्या अभिनव कल्पनांमुळे सर्वच स्तरातील स्त्रीयांना सन्मानाने, निर्भयतेने जगता आले. बसवण्णांची समतावादी भूमिका ही क्रांतिदर्शी ठरली. बसवेश्वर कालीन शिवशरणीचे जीवन साहित्य कर्तुत्व या सर्वांचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की महात्मा बसवेश्वरांच्या उदार आणि उदात्त स्त्री विषयक दृष्टिकोनामुळे तत्कालीन समाजातील मुक्या दुर्लक्षित वंचित स्त्रियांना चैतन्य प्राप्त झाले. प्रचलित रूढींनी या स्त्रियांचजीवन एकाकी निरर्थक परावलंबी बनली होती खऱ्या अर्थाने त्यांना स्व जाणीव निर्माण करून दिली आधुनिक काळात विविध शासकीय धोरणांनी स्त्री शिक्षण महिला सबलीकरण अशा विविध सुविधा पुरवू नये जे साधता आले नाही ते महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात सनातनवाद्यांना विरोध करून प्रतिकूल परिस्थितीवर मात करत स्त्रियांना सबल केले. महात्मा बसवेशवरांचे हे विचार पुढील काळात भक्ती आंदोलनात, वारकरी संप्रदाय, भागवत संप्रदायातही साधर्म्य दर्शवतात. महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकातील सामाजिक, धार्मिक ,अध्यात्मिक चळवळीचे नेतृत्व झुंजारपणे केले म्हणूनच काळाच्या भाळावर उमटलेली क्रांतिकारी समाजसुधारक ही महात्मा बसवेश्वरांची प्रतिमा कोणालाही पुसून टाकता येणार नाही .

**प्रा.डॉ.अश्विनी सोमनाथ रोडे -बेडगे**
**इतिहास विभाग,**
**महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर**
**९०२१०२८७९९**

# महादेव मुंडे खून तपास प्रकरणी खोटी माहिती पसरवल्यास होणार कायदेशीर कारवाई-पोलिसांचा इशारा

बीड/प्रतिनिधी-बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यात दोन वर्षांपूर्वी घडलेल्या आणि संपूर्ण राज्यभर गाजलेल्या महादेव मुंडे खून प्रकरणाच्या तपासाबाबत खोटी माहिती किंवा अफवा पसरविणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा बीडच्या विशेष तपास पथकाने (डखढ) प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे.



सदर प्रकरणातील तपास, विविध मानसशास्त्रीय चाचण्यांचे अहवाल व इतर तपासाशी संबंधित माहिती ही अत्यंत गोपनीय स्वरूपाची असून ती कुठेही प्रसिद्ध किंवा प्रसारित करण्यात आलेली नाही, तसेच ती प्रसारमाध्यमे किंवा सर्वसामान्य नागरिकांना देण्यात आलेली नसल्याचेही पोलिसांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

मात्र आता स्वतः पोलिसांनीच प्रसिद्धीपत्रक काढून या प्रकरणात स्पष्ट खुलासा केल्याने अशा प्रकारची माहिती अधिकृतपणे कोणालाही देण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे खोटी माहिती देऊन अफवा पसरविणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा इशारा प्रसिद्धी पत्रकाद्वारे पोलीस प्रशासनाने दिला आहे.

पोलिसांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलीस ठाणे परळी शहर, जि. बीड येथे गुन्हा क्र. १९१/२०२३, भा.दं.वि. कलम ३०२ अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध दिनांक २२ ऑक्टोबर २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सध्या या गुन्ह्याचा तपास विशेष तपास पथक (डखढ), बीड यांच्या मार्फत सुरू आहे. तपासादरम्यान काही संशयित इसमांच्या पॉलीग्राफ (लाई डिटेक्टर), इएजड / ब्रेन मॅपिंग तसेच व्हॉईस नालिसिस अशा मानसशास्त्रीय चाचण्या करण्यात आलेल्या आहेत.

या चाचण्यांचे अहवाल अत्यंत गोपनीय स्वरूपाचे असून ते तपास यंत्रणेकडे सुरक्षित ठेवण्यात आलेले आहेत. हे अहवाल कोणत्याही अनधिकृत व्यक्तीस, प्रसारमाध्यमांना किंवा सर्वसामान्य नागरिकांना देण्यात आलेले नसल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

अलीकडे या प्रकरणाबाबत विविध माध्यमांतून तसेच सोशल मिडियावरून अप्रमाणित माहिती व अफवा पसरवल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे नागरिकांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच कोणीही खोटी माहिती प्रसारित करत असल्यास त्यांच्यावर कायदेशीर तरतुदीनुसार कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

दरम्यान, सदर गुन्ह्याचा तपास विशेष तपास पथक, बीड यांच्यामार्फत योग्य पद्धतीने व पारदर्शक कायदेशीर प्रक्रियेनुसार सुरू असून तपासाच्या हितासाठी आवश्यक त्या सर्व बाबींची सखोल पडताळणी करण्यात येत आहे, असेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# संत तुकाराम महाराजांनी गाथेतून ज्ञान, विज्ञान, तत्वज्ञान सांगितले व लोकांना आत्मभान दिले. डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड

केज/प्रतिनिधी□स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड येथे दिनांक ५ मार्च २० २६ रोजी संत तुकाराम बीज गाथा प्रवचन, गाथावाचन करून साजरी करण्यात आली. सर्वप्रथम संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.



त्यानंतर ह.भ.प. नारायणभाऊ गायकवाड यांनी संत तुकाराम गाथेतील अभंगावर प्रवचन दिले. त्यानंतर गाथावाचन माजी सरपंच रामराजे गायकवाड, रावसाहेब जाधव, एस. के. वैरागे यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून बन्सीनाना गायकवाड, रामदास राऊत, आरुण गायकवाड, बाळासाहेब गायकवाड यांची उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिध्द वक्ते व परखड व्याख्याते, प्राचार्य डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला.

अध्यक्षीय समारोपात संत तुकाराम महाराजांनी गाथेतुन ज्ञान, विज्ञान, तत्वज्ञान सांगितले व सर्वसामान्य लोकांना आत्मभानाची अनुभुती गाथेतून दिली असे प्रतिपादन डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.

राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. विज्ञान कथा सादरीकरण सार्थक गायकवाड, आनंद गायकवाड, श्रुती पुंड, श्रुती गायकवाड, एस. के. वैरागे, संध्या तट यांनी केले. अध्यक्षीय समारोप डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला. दोन्ही वेगवेगळ्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विधार्थी, वाचक, जेष्ठ नागरीक उपस्थित होते.

# नाव्होलीचे सुपुत्र दत्तात्रय बिक्कड यांची पोलिस उपनिरीक्षक पदी नियुक्ती!



केज/प्रतिनिधी- नाव्होली गावातील अनेक सुपुत्रांनी भारतीय सैनिक दल,पोलिस प्रशासन, डॉक्टर, वकील बँकींग, शिक्षक,कृषिअधिकारी, इंजिनिअरिंग अशा विविध क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत.तर काही सेवानिवृत्त झाले आहेत.सद्या तसेच व्यावसाय, व्यापार आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती अशा विविध क्षेत्रात या गावातील युवा प्रगती आजदेखील करत असुन ज्यामुळे गावाचे नाव महाराष्ट्रात नव्हे तर संपुर्ण देशात होत आहे. अशाच नाव्होली गावचे सुपुत्र श्री.दत्तात्रय बिक्कड यांनी प्रतिकुल परिस्थितीतून मार्ग काढत शुन्यातून विश्व निर्माण करत पोलीस शिपायांपासुन ते आयुष्याचा प्रवास करत आज त्यांची केज पोलिस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक पदी नियुक्ती झाली आहे. त्यामुळे गावकऱ्यांनी काल त्यांचा भ्रम नागरी सत्कार करुन त्यांना जनसेवा करण्याची एक नवी उर्जा निर्माण करुन दिली आहे.

याबाबतची अधिक माहिती अशी की,केज तालुक्यातील नाव्होली या गावातील अनेक जण विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करुन गावाचे नाव मोठे करत असुन नाव्होली गावाची ख्याती म्हणजे मुर्ती लहान पण किर्ती महान या उक्तीप्रमाणे निर्माण झाली आहे.त्यातच याच गावचे सुपुत्र श्री. दत्तात्रय एकनाथ बिक्कड हे एका सामान्य कुटुंबात जन्म घेवुन त्यांनी अथक परिश्रम घेवून आजरोजी उच्चपदावर कार्य करत आहेत. गावातील जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण घेवुन १५ फेब्रुवारी १९९१ रोजी जालना जिल्ह्यात प्रथम पोलिस विभागात भरती झाले. काही वर्षांनंतर त्यांची बिड जिल्ह्यात बदली झाली. त्यांनी बिड जिल्हयातील युसुफ वडगाव,शिरुर(कासार), पिंपळनेर, धारुर,केज,नेकनुर,केज या ठिकाणी कॉन्स्टेबल, हेडकॉन्स्टेबल,ए.एस.आय. आणि आता त्यांची शासकीय नियमानुसार दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोजी केज पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे.त्यामुळे एका छोट्याशा गावातील एका सामान्य कुटुंबातील एक गावचे सुपुत्र तालुक्याच्या ठिकाणी पोलिस उपनिरीक्षक या पदावर गेल्यामुळे आनंदाने त्यांच्या पाठिवर कौतुकाची थाप म्हणुन गावकऱ्यांच्या वतीने दत्तात्रय एकनाथ बिक्कड (भाऊ) यांचा काल दि. ५ मार्च २०२६ रोजी सकाळी गावातील हनुमान मंदिरासमोरील सभामंडपामध्ये भव्य असा नागरी सत्कार करण्यात आला. त्यांचा फेटा बांधुन हार, शाल,श्रीफळ, व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी गावचे सरपंचपती मा.रंजीत (बप्पा) बिक्कड, मा. दिलीपरावजी बिक्कड (सर), रामराव विश्वनाथ बिक्कड, राजेंद्र देविदास बिक्कड (दादा), पुरुषोत्तम बिक्कड, वसंत बिक्कड, अशोक बिक्कड (सामाजिक कार्यकर्ते), विकास बिक्कड, अरुण चौरे (फौजी), प्रशांत देशमुख (सर), शंकर देशमुख, छगन देशमुख, आसाराम बिक्कड, बालासाहेब बिक्कड, बाळासाहेब बिक्कड, सूर्यकांत बिक्कड, गोविंद बिक्कड, बाबासाहेब बिक्कड (सम्राट), ईश्वर बिक्कड, सतीश गायकवाड, पोपट बिक्कड, अंकुश बिक्कड, उत्तरेश्वर शिंदे, सुब्राव शिंदे, सतीश बिक्कड, पत्रकार महादेव काळे यांचे सह आजी माजी सरपंच, उपसरपंच सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन,व्हाईस चेअरमन,गावातील लहान थोर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेणापूर येथील सा.बां. उपविभागाच्या.अद्यावत इमारतीसाठी २ कोटी मंजूर- आ. रमेशआप्पा कराड

लातूर - रेणापूर येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या नवीन अद्यावत कार्यालय इमारत बांधकामासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात १ कोटी ९३ लक्ष ५५ हजार रुपयाची मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत विविध कामांना गती मिळावी सदरील विभागाच्या कार्यालयाची इमारत अद्यावत सुसज्ज व्हावी यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस आणि जिल्हाचे पालकमंत्री तथा राज्याचे सार्वजनिक



बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. केलेल्या पाठपुराव्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांनी अर्थसंकल्प सादर करताना रेणापूर येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या कार्यालय इमारत नव्याने बांधकाम करण्यासाठी १ कोटी ९३ लाखाची तरतूद केली असल्याचे जाहीर केले.

रेणापूर येथे सध्या असलेली सार्वजनिक बांधकाम उपविभागाची दोन मजली इमारत अत्यंत जीर्ण झाली असून अर्थसंकल्पात मंजूर झालेल्या १ कोटी ९३ लक्ष ५५ हजार रुपये खर्चाच्या नव्याने बांधण्यात येणाऱ्या इमारतीत उपविभागीय अधिकारी यांचे कक्ष, शाखा अभियंता यांचे कक्ष, कार्यालयीन कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात येणार असून सर्व सोयीनेयुक्त अशी एक मजली भव्य वास्तू उभारण्यात येईल अशी ही माहिती आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

# 'छत्रपती शिवाजी महाराज सुशासन अभियान' अंतर्गत महसूल व भूमी अभिलेख शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

ठाणे(जिमाका):- नागरिकांना शासकीय सेवांचा लाभ थेट आणि पारदर्शक पद्धतीने मिळावा, या उद्देशाने 'छत्रपती शिवाजी महाराज सुशासन अभियान' अंतर्गत विशेष महसूल व भूमी अभिलेख शिबिराचे आयोजन ७ मार्च रोजी करण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून महसूल आणि भूमी अभिलेख विभागाच्या विविध सेवा सामान्यांच्या दारापर्यंत पोहोचवण्याचा यशस्वी प्रयत्न करण्यात आला.



या विशेष शिबिराचे उद्घाटन आमदार श्री. संजय केळकर यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र आज प्रगतीपथावर आहे. महसूल आणि भूमी अभिलेख विभाग आता पूर्णतः लोकाभिमुख होत असून, नागरिकांना कार्यालयांचे उंबरठे झिजवण्याची गरज उरलेली नाही. महाभूमी पोर्टलसारख्या ऑनलाइन सुविधांमुळे प्रशासकीय प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि गतिमान झाली आहे.

शिबिरादरम्यान नागरिकांना जमीन मोजणी, नकाशांची उपलब्धता, प्रलंबित फेरफार प्रकरणे, सातबारा उतारे आणि ऑनलाइन अर्जांच्या प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. अनेक नागरिकांनी आपल्या प्रलंबित तक्रारींबाबत प्रत्यक्ष अर्ज सादर केले, ज्यावर उपस्थित अधिकाऱ्यांनी जागेवरच तांत्रिक मार्गदर्शन करून शंकांचे निरसन केले.

या प्रसंगी उपविभागीय अधिकारी उर्मिला गलांडे, जिल्हा अधीक्षक (भूमी अभिलेख) नितीन पाटील, तहसिलदार उमेश पाटील, नगर भूमापन अधिकारी सिद्धेश्वर घुले, उप अधीक्षक (भूमी अभिलेख) सचिन वाघ आणि नायब तहसिलदार दिनेश पैठणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित अधिकाऱ्यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या सुशासनाच्या आदर्शातून प्रेरणा घेऊन प्रशासन सामान्यांसाठी जलद आणि पारदर्शक सेवा देण्यास कटिबद्ध आहे.

विविध गावांमधून आलेल्या शेकडो नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. अशा उपक्रमांमुळे शासन आणि जनता यांच्यातील संवाद अधिक दृढ होत असून, प्रशासकीय यंत्रणा अधिक प्रभावीपणे काम करत असल्याच्या भावना लाभार्थ्यांनी व्यक्त केल्या.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.